# परिशिष्ट ७

## क्षमता चाचणी २ (अंतीम चाचणी)

इयत्ता: पाचवी

विषय: सामान्य विज्ञान

प्राप्त गुण [ ]

एकूण गुण [५०]

विद्यार्थ्याचे नाव:- वेळ-१ १/२ तास

आसन क्रमांक:-

शाळेचे नाव :-

---

सूचना :- प्रश्न काळजीपूर्वक वाचा. काही प्रश्नांसमोर कंसात काही सूचना दिल्या आहेत. त्या सूचनांचा विचार करून त्या प्रश्नांची उत्तरे अचूक व योग्य पध्दतीने लिहा. प्रत्येक प्रश्नांच्या अचूक उत्तराला १ गुण देण्यात येईल.

---

### क्षमता क्रमांक १

प्रश्न १ चिमणीच्या अंड्यातून चिमणीचे पिलू बाहेर येते, यात सजीवांचे कोणते लक्षण दिसून येते?

प्रश्न २ घडणाऱ्या घटनांना योग्य प्रतिसाद देणे ही सजीवांची ----- क्षमता आहे. (प्रजनन/श्वसन/चेतना- यापैकी योग्य शब्द गाळलेल्या जागी भरा)

प्रश्न ३ योग्य प्रतिसाद : चेतना क्षमता :: अंड्यातून पिलू : -------

(रिकाम्या जागी पुढील पर्यायातील योग्य शब्द घाला.)

१) वाढ २)प्रजनन ३) श्वसन

प्रश्न ४. 'मी श्वासाबरोबर शरीरात जातो आणि सर्व शरीरभर पसरतो' या विधानातील मी कोण ते लिहा.

प्रश्न ५. रोहणचा तापलेल्या कढईला चुकून हात लागला, तेव्हा चटकन त्याने त्या कढईपासून हात दूर नेला. हे सजीवांचे कोणते लक्षण आहे ते लिहा.

प्रश्न ६. निर्जीवांची वाढ होते / होत नाही . ( या विधानातील अधोरेखीत शब्दांपैकी अयोग्य शब्दावर तिरपी रेघ मारा.

---

## क्षमता क्रमांक २

---

प्रश्न १. धने पेरल्यानंतर कोथींबीर उगवली या घटनेवरून कोणते लक्षण स्पष्ट होते ते लिहा.

प्रश्न २. ज्या वनस्पतींचे प्रजनन बियांपासून होते अशा दोन वनस्पतींची नावे लिहा.

१) ----- २) ------

प्रश्न ३. कांदा या वनस्पतीचे प्रजनन बियांपासून होत नाही हे विधान चूक की बरोबर ते लिहा.

प्रश्न ४. उसाचे पीक येण्यासाठी उसाच्या बिया लावाव्या लागतात (हे विधान चूक की बरोबर ते लिहा. )

---

## क्षमता क्रमांक ३

---

प्रश्न १. स्वत: सारख्याच दुसऱ्या सजीवाला जन्म देणे याला सजीवांचे प्रजनन किंवा .....असे म्हणतात.(रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.)

प्रश्न २. वनस्पतीच्या बियांपासून त्याच प्रकारच्या वनस्पतीचे प्रजनन होते हे एका उदाहरणाने स्पष्ट करा.

प्रश्न ३. चिंचेच्या झाडाला चिंचाच येतात . असे का घडते ते लिहा.

प्रश्न ४. नारळाच्या झाडाला नारळच येतात असे का घडते ते लिहा.

प्रश्न ५. बऱ्याच वेळा आंब्याच्या झाडाला पेरू सुद्धा येतात. हे विधान चूक की बरोबर लिहा.

---

क्षमता क्रमांक ४

---

प्रश्न १ प्राणी आणि वनस्पती यातील फक्त एक फरक लिहा.

प्रश्न २ 'वाघासारखा मांसभक्षी प्राणी स्वत:चे अन्न स्वत: तयार करतो' हे विधान चूक की बरोबर ते लिहा.

प्रश्न ३ वनस्पती सजीव असल्यामुळे वनस्पतींना स्थलांतर करता येते. (हे विधान चूक की बरोबर लिहा)

प्रश्न ४ प्राण्यांना ठराविक आकृती असते/नसते.

(अधोरेखीत शब्दांपैकी अयोग्य शब्दांवर तिरपी रेघ मारा)

प्रश्न ५ 'वड या सजीव वनस्पतीला स्थलांतर करता येते' हे विधान चूक की बरोबर ते लिहा.

---

क्षमता क्रमांक ५

प्रश्न १ अनुकूलन म्हणजे काय?

प्रश्न २ देवदार वृक्षाची पाने निमुळती असतात. (कारण लिहा)

प्रश्न ३ फड्या निवडुंगाचे खोड गीरदार आणि हिरवे/तपकिरी असते.

(अधोरेखीत शब्दापैकी अयोग्य शब्दावर तिरपी रेघ मारा.)

प्रश्न ४ उंटाच्या ---- त्वचेच्या घडीने झाकलेल्या असतात. (रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.)

प्रश्न ५ थंड हवेपासून रक्षण व्हावे म्हणून बर्फाळ प्रदेशातील याकच्या अंगावर विरळ/काळे/दाट केस असतात. (अधोरेखीत शब्दांपैकी अयोग्य शब्दावर तिरपी रेघ मारा.)

प्रश्न ६ मला पाण्यात पोहता यावे म्हणून माझ्या शरीरावर पर असतात. (या विधानातील मी कोण ते लिहा)

प्रश्न ७ पक्ष्याची हाडे पोकळ/बाकदार असल्यामुळे त्यांच्या शरीराचे एकूण वजन कमी राहते. (अधोरेखीत शब्दांपैकी अयोग्य शब्दावर तिरपी रेघ मारा.)

प्रश्न ८ कमळाची पाने पाण्यात का बुडत नाहीत कारण लिहा.

प्रश्न ९ काटेरी वनस्पती खाणे शक्य होण्याकरिता ----- दात बळकट असतात. (उंटाचे/घोड्याचे अधोरेखीत शब्दांपैकी योग्य शब्द भरून रिकामी जागा पूर्ण करा.)

प्रश्न १० नाकतोड्याच्या ---- रंगामुळे चिमण्या, साळुंक्यांना त्याचे पानावरील अस्तित्व सहजपणे कळत नाही. (रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.)

---

## -:प्रात्यक्षिक प्रश्न:-

---

### क्षमता क्रमांक ६

सूचना - शिक्षक विद्यार्थ्यांना पुढील कृती गटवार करण्यास सांगतात.-- 'एका काचेच्या बशीत पाण्याने ओला केलेला कापूस घ्या. त्याच्यावर घेवड्याचे पाचसहा दाणे ठेवा. दाण्यांत होणाऱ्या बदलांचे रोज निरीक्षण करा

व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

प्रश्न १ तीनचार दिवसात बी च्या छिद्रातून जो भाग बाहेर येतो त्याला काय म्हणतात?

प्रश्न २ दलातील कोंबाच्या कमानदार दांडा होतो व त्याच्या टोकावर कोणता भाग असतो?

प्रश्न ३ खोड कोणत्या भागापासून तयार होते?

प्रश्न ४ कोणत्या भागापासून मूळ तयार होते?

प्रश्न ५ पाने कोणत्या भागावर येतात?

---

क्षमता क्रमांक ७

---

सूचना : - शिक्षक विद्यार्थ्यांना पढील कृती गटवार करण्यास सांगतात.- -- मुठभर कोरडे मुग घ्या . त्यातील चिमुटभर मुग बाजुला ठेवा. उरलेले मुग आठ तास पाण्यात भिजत ठेवा. भिजलेले मुग पाण्याबाहेर काढून त्याचे तीन समान वाटे करा. एक वाटा पाण्यात बुडवून ठेवा. दुसरा वाटा एका लहानशा वाटीत ठेऊन ही वाटी पसरट भांडयातील थंड पाण्यात ठेवा. तिसरा वाटा कापडाच्या पुरचुंडीत बांधून ठेवा. तिन्ही वाटयांचे तसेच कोरड्या ठेवलेल्या मटकीचे दुसऱ्या दिवशी निरीक्षण करा. आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

प्रश्न १. कोरड्या मुगाला मोड का आले नाहीत ?

प्रश्न २. पाण्यात बुडवून ठेवलेल्या मुगाला मोड का आले नाहीत ?

प्रश्न ३. थंड पाण्यात ठेवलेल्या मुगाला मोड का आले नाहीत ?

प्रश्न ४. पुरचुंडीत बांधून ठेवलेल्या मटकीला जोमदार मोड आले . याचे कारण काय ?

प्रश्न ५. बीजांकुरणासाठी कोणत्या तीन घटकांची आवश्यकता असते असे वरील प्रयोगावरून समजले ?

---

तोंडी प्रश्न (कोणतेही ४ प्रश्न विचारा.)

---

क्षमता क्रमांक १

---

प्रश्न १. आपल्या उच्छवासात कार्बन डाय ऑक्साईड असतो हे कोणत्या प्रयोगातून सिद्ध होते? त्या प्रयोगाची कृती थोडक्यात सांगा.

प्रश्न २. मांजर स्वस्थ बसले असताना त्याचे पोट वरखाली का होत असते?

प्रश्न ३. श्वसन कशाला म्हणतात ?

प्रश्न ४. आपल्या उच्छवासात कोणता वायु असतो ?

प्रश्न ५. चुन्याच्या निवळीत आपण फुंकर मारली तर काय घडेल ?

प्रश्न ६. वाढ हे सजीवांचे एक लक्षण आहे हे एका उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करा.

प्रश्न ७. जमिनीवरील सजीवांना ऑक्सीजन कोठून मिळतो ?

प्रश्न ८. नागाला दगड मारला असता तो फणा उगारतो यावरून सजीवांचे कोणते लक्षण दिसून येते ?

प्रश्न ९. कोकीळेच्या अंड्यातून कोकीळेच पिलू बाहेर येते . यावरून सजीवांचे कोणते लक्षण दिसून येते ?

प्रश्न १०. भोपळ्याच्या वेलाला फुटलेले तणाव आधाराला गुंडाळले जातात . यावरून सजीवांचे कोणते लक्षण दिसून येते ?

प्रश्न ११. नाक दाबले की मुले तोंड का उघडतात ?

प्रश्न १२. कावळीने जर कोकीळेची अंडी उबवली तर त्यातून कशाचे पिलू बाहेर येते ?

प्रश्न १३. प्रजनन म्हणजे काय ?

प्रश्न १४. चेतना क्षमता म्हणजे काय ?

प्रश्न १५. सजीवांची कोणतीही तीन लक्षणे सांगा .

प्रश्न १६. पैसा किंवा वाणी नावाच्या किड्याला स्पर्श केला तर काय होईल ?

प्रश्न १७. 'मी श्वासाबरोबर शरीरात जातो आणि सर्व शरीरभर पसरतो या विधानातील 'मी' कोण ते सांगा .

प्रश्न १८. वनस्पती हालचाल करतात हे एका उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करा.

प्रश्न १९. झाडाच्या उंचीत दरवर्षी फरक आढळतो . कारण सांगा.

प्रश्न २०. कबड्डीच्या सामन्यामध्ये इयत्ता पाचवीच्या वर्गाचा संघ विजयी ठरला . तेव्हा इयत्ता ५ ची मुले आनंदाने उड्या मारू लागली. हे सजीवांचे कोणते लक्षण आहे ?

---

क्षमता क्रमांक २. (कोणताही एक प्रश्न विचारा.)

---

प्रश्न १. ज्या वनस्पतींचे प्रजनन बियांपासून होत नाही अशा दोन वनस्पतींची नावे सांगा.

प्रश्न २. आंब्याचे रोप यावे म्हणून काय लावावे लागते ?

प्रश्न ३. भुईमुगाचे पीक घेण्यासाठी शेतकरी कशाचे बियाणे पेरतो?

प्रश्न ४. मिरचीच्या बियाणापासून कोणत्या वनस्पतीची रोपे तयार होतात ?

प्रश्न ५. तुम्हाला गाजराचे पीक हवे असेल तर तुम्ही त्याकरिता जमिनीत काय पेराल ?

---

क्षमता क्रमांक ५ (कोणतेही ५ प्रश्न विचारा.)

---

प्रश्न १. अस्वल या प्राण्याच्या शरीरावर दाट व लांबसडक केस असतात. कारण सांगा.

प्रश्न २. परिसराशी मिळते जुळते रंग असणे हा अनुकूलनाचा एक प्रकार आहे हे एका उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करा.

प्रश्न ३. परिसराप्रमाणे रंग बदलणाऱ्या प्राण्याचे नाव सांगा.

प्रश्न ४. पाणी या परिसराशी अनुकूलन साधलेल्या सजीवाचे एक नाव सांगा .

प्रश्न ५. उष्ण हवामान या परिसराशी अनुकूलन साधलेल्या सजीवाचे एकनाव सांगा.

प्रश्न ६. फुलावर बसलेली फुलपाखरे पटकन का ओळखता येत नाहीत?

प्रश्न ७. वाळवंटात पाणी न मिळाल्यास उंट आपली पाण्याची गरज कशी भागवतो ?

प्रश्न ८. पक्षी असूनही बदकाला पाण्यात कसे पोहता येते?

प्रश्न ९. उंटाचे पाय लांब असतात. कारण सांगा.

प्रश्न १०. पक्ष्यांचे वजन कमी का असते ?

प्रश्न ११. माशांच्या त्वचेतून बुळबुळीत पदार्थ स्रवतो. कारण सांगा.

प्रश्न १२. उंटाच्या पायांना खूर नसून त्यांना गादीसारखे पसरट व जाड तळवे असतात. कारण सांगा.

प्रश्न १३. उंटाच्या पाठीवर जी मदार असते त्यात काय साठवलेले असते ?

प्रश्न १४. हिमवृष्टी पासून संरक्षण व्हावे म्हणून बर्फाळ प्रदेशातील वृक्षांना आकार कसा असतो ?

प्रश्न १५. निवडुंगाच्या पानांचे काट्यात रुपांतर झालेले असते. कारण सांगा.

प्रश्न १६. मासा आणि बकरी यातील कोणतेही दोन फरक सांगा.

प्रश्न १७. जनावरे आणि पक्षी यातील कोणतेही दोन फरक सांगा.

प्रश्न १८. अस्वल आणि उंट यातील कोणतेही दोन फरक सांगा.

प्रश्न १९. वड आणि वेलवार या दोन वनस्पतीतील कोणतेही दोन फरक सांगा.

प्रश्न २०. मासा आणि बकरी यातील कोणतेही दोन फरक सांगा.

प्रश्न २१. थंड प्रदेशात राहणाऱ्या कोणत्याही दोन प्राण्यांची नावे सांगा.

प्रश्न २२. पाण्यात राहणाऱ्या कोणत्याही दोन प्राण्यांची नावे सांगा.

प्रश्न २३. आकाशात उडणाऱ्या कोणत्याही दोन पक्षांची नावे सांगा.

प्रश्न २४. बर्फाळ प्रदेशातील कोणत्याही दोन वृक्षांची नावे सांगा.

प्रश्न २५. पाण्यात वाढणाऱ्या कोणत्याही दोन वनस्पतींची नावे सांगा.